## शिष्यवृत्तीसाठी आवाहन

**नाशिक :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी मातंग समाज आणि त्यातील १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांनी २० जुलैपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक ताराचंद कसबे यांनी केले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादिततर्फे ही शिष्यवृत्ती दिली जाते. इयत्ता दहावी, बारावी, पदवी, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमात २०२४-२५ मध्ये ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती मिळेल. कागदपत्रे दोन प्रतीत अर्जासोबत महामंडळाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नासर्डी पुलाजवळ, जिल्हा कार्यालयात २० जुलैपर्यंत पाठवावेत. अधिक माहितीसाठी ०२५३- २२३६०८१ या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

## विजय आव्हाड यांची निवड

**नाशिक :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या राष्ट्रवादी विद्यार्थी



काँग्रेसच्या नाशिक जिल्हा कार्याध्यक्षपदी विजय आव्हाड यांची नियुक्ती केली. पक्षाचे विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांच्या मान्यतेने ही नियुक्ती केली असून पक्षाची ध्येयधोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करावे, अशी अपेक्षा जिल्हाध्यक्ष ॲड. तुषार जाधव यांनी व्यक्त केली.

# औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची दुर्दशा

## मंत्री छगन भुजबळ यांची दुरुस्तीची सूचना

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची दुर्दशा झाली असून त्यामुळे वाहतुकीवर परिणाम होऊन छोट्या, मोठ्या अपघातांना निमंत्रण मिळत आहे. सांडपाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था नसल्याने हे पाणी कारखान्यांमध्ये शिरते. अपुरा पाणी पुरवठा, बंद पडलेले पथदीप, खड्डेमय रस्ते यावरून अंबड इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (आयमा) रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा दिला आहे. सातपूर आणि अंबड औद्योगिक वसाहतीतील खड्ड्यांची समस्या उद्योजकांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्यासमोर मांडली. भुजबळ यांनी खड्डेमय रस्त्यांची पाहणी करुन खड्डे बुजविण्याची सूचना यंत्रणेला केली.

शहराप्रमाणे औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची बिकट स्थिती आहे. अंबड वसाहतीतील रस्त्यांची दयनीय अवस्था व मूलभूत सुविधांचा अभाव यावरून संतप्त उद्योजकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. मूलभूत सुविधांअभावी उद्योजकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. शासनाने उद्योजकांना उद्योगांसाठी एमआयडीसीतर्फे भाडे तत्त्वावर भूखंड, महावितरणतर्फे वीज आणि इतर मूलभूत सुविधा पुरवल्या. परंतु, एमआयडीसीने महापालिकेशी करार करून रस्ते, पथदीप हे देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेकडे वर्ग केले आणि पर्यायाने उद्योजकांना महानगरपालिकेकडे कर भरण्यास भाग पाडले. महापालिकेला सर्वाधिक महसूल देणाऱ्या उद्योजकांना त्रास सहन करावा लागत असल्याकडे अलिकडेच आयमाच्या पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले होते. औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची देखभाल योग्य प्रकारे होत नसल्याने परिस्थिती अक्षरशः हाताबाहेर गेली आहे. मागील काही वर्षांत औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग वाढले. कामगारांची संख्या वाढली, वाहतूक देखील वाढली. परंतु, त्या तुलनेने रस्त्यांची अवस्था मात्र बदलली नाही. रुंदीकरण न झाल्याने छोट्या-मोठ्या अपघातांना निमंत्रण मिळते. एक्सलो पॉईंट, गरवारे पॉईंट, डी.सेक्टर, ए.सेक्टर, के सेक्टर, बी.सेक्टर, डब्ल्यू, जी, एच सेक्टर आदी परिसर जणू मृत्यूचे सापळे झाल्याकडे आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे आणि मूलभूत समितीचे कुंदन डरंगे यांनी लक्ष वेधले होते.

नैसर्गिक नाले बुजले गेल्याने औद्योगिक वसाहतील सांडपाण्याला निमंत्रण मिळते. परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरते. सांडपाणी प्रक्रिया केंद्र नसल्याने अथवा सांडपाणी निचरा होण्याची व्यवस्था नसल्याने रोगराईला निमंत्रण मिळते. वारंवार समस्या मांडूनही कार्यवाही होत नसल्याची उद्योजकांची तक्रार आहे. आयमा आणि निमाचे माजी अध्यक्ष धनंजय बेळे यांनी एमआयडीसी परिसरातील सर्व रस्ते ट्री-मिक्स पद्धतीचे व्हावे, अशी मागणी केली होती. भुजबळ यांनी रस्त्यांची पाहणी केली.



**उद्योजकांचे गाऱ्हाणे**

सातपूर आणि अंबड औद्योगिक वसाहतींमधील समस्या उद्योजकांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यासमोर मांडल्या. त्यानंतर उद्योजकांसमवेत भुजबळ यांनी औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची पाहणी केली. रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावे, अशा सूचना त्यांनी यंत्रणेला दिल्या.

## भात लावणी यंत्राचे प्रात्यक्षिक

**नाशिक :** पारंपरिक भात लागवडीला फाटा देत बळीराजाने नव्या कृषी तंत्रज्ञानाची कास धरणे आवश्यक आहे. भात लावणीचे काम अतिशय कष्टाचे असून या कामाला कायमच मजुरांची चणचण भासते. परिणामी शेतकऱ्यांना त्रास होऊन याचा दुष्परिणाम उत्पन्नावर होतो. या किचकट कामातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी म्हणून राज्याचे कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी भात लागवड यंत्र वापरण्यास चालना दिली आहे. त्यानुसार इगतपुरी तालुका कृषी विभागाकडून भात उत्पादकांना या यंत्राबाबत माहिती दिली जात आहे. बॅटरीवर चालणाऱ्या स्वयंचलित व मानवचलित भात लावणी यंत्राचा वापर करण्यासाठी कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. या यंत्रामुळे गुडघाभर चिखलात भाताची लावणी करण्यापासून शेतकरी व मजुरांची सुटका होणार आहे. शेतकऱ्यांचा वेळ व पैशाची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. भातबहुल इगतपुरी तालुक्यातील टाकेद बुद्रुकचे शेतकरी रतन बांबळे, अडसरे खुर्दचे शेतकरी गणपत मोंढे यांच्या शेतावर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्यामार्फत बॅटरी ऑपरेटेड भात लागवड यंत्र व मानवचलित भात लागवड यंत्राचे प्रात्याक्षिक करण्यात आले. यंत्राबाबत विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. विजय आवारे, प्रा. डॉ. महेश जाधव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. इगतपुरीचे कृषी अधिकारी रामदास मडके, मंडळ कृषी अधिकारी संजय पाटील, उपकृषी अधिकारी नानाभाऊ पवार आदी यावेळी उपस्थित होते.

## जुन्या नाशिकमध्ये दोन जणांची आत्महत्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** जुने नाशिकमधील वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या दोन जणांनी गळफास घेतला. त्यांच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. पहिली घटना काझीगडी येथील कुंभार वाड्यात घडली.

कुंभारवाड्यात वास्तव्यास असणाऱ्या जुबेर पठाण (३२) यांनी रात्री घरात फळीला ओढणी बांधून गळफास घेतला. याबाबत रुक्सार पठाण यांनी माहिती दिली. दुसरी घटना जाकिर हुसेन रुग्णालय भागात घडली. बिट्टू यादव (२४, फत्तेपूर, गया ,बिहार) असे मृताचे नाव आहे. याबाबत सिडकोतील बाळासाहेब गांगुर्डे यांनी माहिती दिली. गांगुर्डे यांचा माल वाहतुकीचा व्यवसाय आहे. चार दिवसांपूर्वी गांगुर्डे यांनी यादव यांची नेमणूक केली होती. रविवारी मात्र त्याने आत्महत्या केली.




## घरफोडीचे सत्र कायम

शहरात वेगवेगळ्या भागात झालेल्या घरफोडीच्या दोन घटनांमध्ये चोरट्यांनी सुमारे तीन लाखांचा ऐवज चोरण्यात आला. पहिली घटना गोविंदनगर येथील वारियर स्पेस येथे घडली. या बाबत मोनिष देवरे यांनी तक्रार दिली. देवरे कुटूंबिय बाहेरगावी गेले असताना चोरट्यानी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून दीड लाखाची रोकड, दागिने असा पावणेदोन लाखहून अधिक रुपयांचा ऐवज चोरला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. दुसरी घरफोडी नाशिक-पुणे मार्गावरील बोधलेनगर भागात झाली.

## दुकान फोडून दोन लाखांचा ऐवज लंपास

नाशिकरोडच्या सुभाषनगरात दारू दुकान फोडून चोरट्यांनी सुमारे दोन लाख रुपयांचा ऐवज चोरला. याबाबत अमित ओचानी (सानेगुरूजी नगर) यांनी तक्रार दिली. ओचानी यांचे सुभाष रस्त्यावरील कदम इमारतीत दारूचे दुकान आहे. शुक्रवारी रात्री दुकान वाढवून ते घरी गेले होते. चोरट्यांनी बंद दुकानाची लोखंडी जाळी आणि शटर वाकवून चोरी केली. गल्ल्यातील सुमारे दोन लाख रुपये लंपास केले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### यू ग्रो कॅपिटल लिमिटेड

UGRO CAPITAL

४था मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई-४०००७०.

**ताबा सूचना (परिशिष्ट IV) [रुल ८(१) पाहा] स्थावर मालमत्तेकरिता**

ज्याअर्थी, **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड**चे, असलेले तिचे नोंदणीकृत कार्यालय - ४था मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई-४०००७०, प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रकमेवरील व्याजासह एकत्रित सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना निर्गमित केली आहे.
ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात आली आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी याखाली नमूद केलेल्या दिवस, महिना व वर्ष यानुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखालील वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषकरून ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी उक्त मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार रकमेवरील व्याजासह एकत्रित सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेकरिता **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

| अ. क्र. | ऋणकोचा तपशील | मागणी सूचना | गहाणवट मालमत्ता | ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | १. रेन्बो डेको प्लास प्रायव्हेट लिमिटेड<br>२. दिपमालादेवी सुरेंद्रकुमार राय<br>३. सुरेंद्रकुमार रामनारायण राय<br>लोन अकाऊंट नंबर : UGNSKMC0000059060 | मागणी सूचना दिनांकित १६-एप्रिल-२५ रक्कम रु. २,७४,३५,६८६.००/- (रुपये दोन कोटी चौऱ्याहत्तर लाख पस्तीस हजार सहाशे शहाऐंशी फक्त) ०८-एप्रिल-२५ | मॉडेल : पेर्टियस इंजिमेक प्रा.लि. - यूज्ड प्रेस मशिन ८००टी प्रेस<br>मेक : कोमत्सू इन्व्हॉईस नं. : ६५५ ते ६५८<br>मॉडेल : पेर्टियस इंजिमेक प्रा.लि. - यूज्ड प्रेस मशिन ६००टी प्रेस<br>मेक : कौशिको इन्व्हॉईस नं. : ६६७ ते ६७१<br>मॉडेल : पेर्टियस इंजिमेक प्रा.लि. - यूज्ड प्रेस मशिन ४००टी प्रेस<br>मेक : कौशिको इन्व्हॉईस नं. : ६६७ ते ६७१ | ११.०७.२०२५ |

स्थळ : नाशिक
दिनांक : १५.०७.२०२५

स्वाक्षरी/- (प्राधिकृत अधिकारी)
यू ग्रो कॅपिटल लिमिटेडकरिता

# युनेस्कोच्या यादीत किल्ले समावेशाचा आनंदोत्सव



भाजपतर्फे नाशिकरोड परिसरात मिठाई वाटप करुन आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** जिल्ह्यातील साल्हेरसह राजगड, रायगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूतील जिंजी या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आल्याने शहरासह जिल्ह्यातील शिवप्रेमी, दुर्गप्रेमींसह राजकीय पक्षांनी आनंदोत्सव साजरा केला आहे. संपूर्ण मराठी जनतेसाठी आणि छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट असल्याची प्रतिक्रिया उमटली आहे.

**भाजपतर्फे मिठाई वाटप**

भाजपतर्फे नाशिकरोड, पंचवटी येथे १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेशाबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. भाजप नाशिकरोड मंडलाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे पूजन करुन मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी मंडल अध्यक्ष शांताराम घंटे, योगेश भगत, राजेश आढाव, बापू सापुते, टिंकू खोले आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्गसंपदा म्हणजे महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा आहे. 'युनेस्को'चा दर्जा हा त्या ऐतिहासिक समृद्धतेला जागतिक मान्यता देणारा आहे, असे मत सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी व्यक्त केले. भाजप तपोवन मंडलाच्या वतीने पंचवटी कारंजा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. ढोल ताश्याच्या गजरात नागरिकांना पेढे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाजप नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनील केदार, मंडल अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, उत्तमतात्या उगले, महेश महंकाळे, युवराज झोमान, राहुल कुलकर्णी आदी उपस्थित होते. भाजप पंचवटी मंडलाच्यावतीने मालेगांव स्टँड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची स्वच्छता करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी फटाके फोडण्यात आले.

### साल्हेरमध्ये आनंदोत्सव

शिवकालीन साल्हेर किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश झाल्यामुळे संपूर्ण बागलाण तालुक्यात नवचैतन्य पसरले असून आमदार दिलीप बोरसे यांच्या नेतृत्वाखाली किल्ला परिसरातील मातीला वंदन करून जल्लोष करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाच्या घोषणांनी यावेळी संपूर्ण परिसर दणाणून गेला. बागलाण तालुक्यातील साल्हेर हा महाराष्ट्रातील सर्वोच्च उंचीचा किल्ला आहे. साल्हेरच्या लढाईचे जागतिक युद्धाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान असून, युनेस्कोने भारतातील किल्ल्यांचा वारसा स्थळांमध्ये समावेश केला आहे.

### ॲक्सिस बँक लि.

**गहाण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्यासाठी जाहीर सूचना**

विशेष करून कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या खात्यांमधील गहाणतारण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव खाली नमूद करण्यत आलेल्या बँकेच्या शाखांमध्ये करण्याचे नियोजित करण्यात आले आहे.
खाली नमूद करण्यात आलेल्या कर्जदारांनी ॲक्सिस बँक लि. यांच्याकडे सोन्याचे दागिने गहाण ठेवून कर्ज सुविधा ('सोने तारण कर्ज सुविधा') प्राप्त केली आहे. सदर सोने तारण कर्जाची येणे बाकी रक्कमेची परतफेड करण्यासाठी सदर कर्जदार/जामीनदार यांना मागणी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. जसे की, कर्जदार/जामीनदार यांनी येणे बाकी रक्कमेची परतफेड केलेली नाही, त्यामुळे बँकेस सदर तारणाचा वापर करून गहाण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा विशेषतः पुढील परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या दागिन्यांचा **दि. २५/०७/२०२५ रोजी दुपारी १२.३० ते ३.३० दरम्यान ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे, जसे आहे,'' ''तेथे जे काही आहे,''आणि ''कोणताही फेरविचार नाही''** या तत्त्वावर ई-लिलाव करणे भाग आहे. कर्जदार आणि त्यांच्याकडून येणे असलेल्या रक्कमेचा तपशील पुढीलप्रमाणे :

| ग्राहकाचे नांव | कर्ज खाते क्र. | येणे रक्कम (रु.) | रिकॉल नोटीसीची तारीख | एकूण वजन | निव्वळ वजन |
|---|---|---|---|---|---|
| **शाखेचे नाव : बोधलेनगर एनएएस (महाराष्ट्र)** | | | | | |
| राहुल नवनाथ तांबे | xxxxxxxxxxx३८३७ | ३३५९५२.०० | २४/०३/२०२५ | ७९.२०० | ७५.३०० |
| निर्मला गोविंद गांगुर्डे | xxxxxxxxxxx४०९७ | २८६२९३.०० | ०५/०६/२०२५ | ६४.७०० | ५८.९०० |
| निर्मला गोविंद गांगुर्डे | xxxxxxxxxxx५९२२ | १२९५१०.०० | ०५/०६/२०२५ | २९.२०० | २८.४०० |
| हिना मुनवर चौधरी | xxxxxxxxxxx१४२० | ४३४७४.०० | २८/११/२०२४ | १२.७०० | १२.३०० |
| **शाखेचे नाव : दिंडोरी (महाराष्ट्र)** | | | | | |
| सतीश प्रभाकर जाधव | xxxxxxxxxxx९७१४ | ४८७३६७.६१ | २४/०३/२०२५ | ९६.१०० | ९५.३०० |
| साहेबराव कारभारी आहेर | xxxxxxxxxxx००६१ | १७९४३२.१० | १६/०६/२०२५ | ३०.२०० | २९.७०० |
| सीमा संतोष वडजे | xxxxxxxxxxx९७२८ | १३५५८५.०९ | १६/०६/२०२५ | ४०.५०० | २६.३०० |
| मनिषा खंडू झिरवाळ | xxxxxxxxxxx९८३८ | १०६८६३.०० | २८/११/२०२४ | ३३.६०० | ३२.५५० |
| आनंद शिवाजी थेटे | xxxxxxxxxxx५८७३ | १११०१३.०० | २४/०३/२०२५ | ३३.३०० | २०.८०० |
| युवराज विठ्ठल घंगाळे | xxxxxxxxxxx१८४५ | ५७९२०.९४ | ०५/०६/२०२५ | १३.१८० | १२.३८० |
| अविनाश शरद शिंदे | xxxxxxxxxxx६४६५ | ३७७४१.०० | २८/११/२०२४ | ७.७४० | ७.६४० |
| **शाखेचे नाव : गाणगापूर रोड, नाशिक (महाराष्ट्र)** | | | | | |
| निलेश सुधाकर वडिले | xxxxxxxxxxx०२५४ | २१०२५५.०० | ११/१२/२०२४ | ४५.४१० | ४१.२१० |
| **शाखेचे नाव : कळवण सी२७२४ (महाराष्ट्र)** | | | | | |
| रुतुराज नंदकिशोर पगार | xxxxxxxxxxx४११६ | १५११०३.०० | १६/०५/२०२५ | ३१.२०० | २९.४०० |
| **शाखेचे नाव : लासलगांव (महाराष्ट्र)** | | | | | |
| सोपान बाबुराव चव्हाण | xxxxxxxxxxx५३७७ | १३५६७३.६५ | १६/०६/२०२५ | २४.९०० | २३.५०० |
| **शाखेचे नाव : मालेगाव (महाराष्ट्र)** | | | | | |
| अहिरे संजय अशोक | xxxxxxxxxxx३२२९ | २५९४६७.०० | १६/०६/२०२५ | ४५.००० | ४४.३०० |
| सुवर्णा कपिल शिरसाठ | xxxxxxxxxxx८५९९ | २३२४९७.०० | १९/०५/२०२५ | ५६.००० | ५१.००० |
| गोरख दादाजी भामरे | xxxxxxxxxxx४२३१ | १०३२४८.०० | २७/०९/२०२४ | २०.२०० | १८.६५० |
| अन्सारी मुझफ्फर हुसेन एजाज अहमद | xxxxxxxxxxx४४६८ | १५०७८२.४० | २५/११/२०१९ | १९.८०० | १६.८०० |
| **शाखेचे नाव : नाशिक (महाराष्ट्र)** | | | | | |
| मजहर अन्सार सय्यद | xxxxxxxxxxx३६५३ | २०८५८७.५६ | १६/०५/२०२५ | ५३.५०० | ४९.२०० |
| राहुल भास्कर शेलार | xxxxxxxxxxx८४१३ | १३२०९९.३० | १६/०६/२०२५ | २९.२०० | २८.३०० |
| राहुल भास्कर शेलार | xxxxxxxxxxx४००९ | ७८५६६.९५ | १६/०६/२०२५ | १६.२०० | १५.४०० |
| माधुरी महेंद्र जयस्वाल | xxxxxxxxxxx६१५७ | ३१९६५.६५ | २४/०३/२०२५ | ६.८०० | ६.५०० |
| **शाखेचे नाव : ओझर (महाराष्ट्र)** | | | | | |
| निलेश मोतीराम शिंदे | xxxxxxxxxxx८६८२ | ११५९०२.०० | ३०/०३/२०२५ | २५.३८० | २४.७३० |
| **शाखेचे नाव : पिंपळगांव (महाराष्ट्र)** | | | | | |
| बाळासाहेब जगन्नाथ निरगुडे | xxxxxxxxxxx०१२१ | २००८८१.०० | १६/०६/२०२५ | ३५.४५० | ३४.५०० |
| केतन कैलास मोगल | xxxxxxxxxxx७३५८ | ३७७१५.०० | ०५/०६/२०२५ | ७.५५० | ७.१५० |
| **शाखेचे नाव : सटाणा (महाराष्ट्र)** | | | | | |
| वैभव भिका सोनवणे | xxxxxxxxxxx५४२५ | ६८७२१.९१ | २२/११/२०२४ | १४.८०० | १४.००० |
| शिवाजी रतन सोनवणे | xxxxxxxxxxx८१२१ | ५२७५८.०० | ०७/१०/२०२४ | १२.३५० | ११.९९० |
| **शाखेचे नाव : सिन्नर, नाशिक (महाराष्ट्र)** | | | | | |
| कांचन दत्तात्रय गुंजाळ | xxxxxxxxxxx१३२४ | ७७३५७.७३ | १६/०६/२०२५ | १४.८०० | १४.५०० |
| **शाखेचे नाव : येवला, नाशिक (महाराष्ट्र)** | | | | | |
| नारायण माधव गवळी | xxxxxxxxxxx०१८२ | ५२१९८.०० | १६/०६/२०२५ | १२.३०० | १२.१०० |
| शिवाजी जगनंत चवंदगीर | xxxxxxxxxxx७५३९ | २६५३७.०० | ०५/०६/२०२५ | ७.००० | ६.७०० |

कोणतीही पूर्वसूचना न देता खाते बंद करण्याचा / लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार ॲक्सिस बँक लि. यांना आहे. लिलाव ऑनलाईन पद्धतीने **https://gold.samil.in** या वेबसाईटवर दुपारी १२.३० ते ३.३० दरम्यान करण्यात येईल.
सविस्तर अटी आणि शर्तींसाठी कृपया **https://gold.samil.in** या वेबसाईटवर लॉगइन करा.

**अधिकृत अधिकारी**
**ॲक्सिस बँक लि.**

### pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

**परिशिष्ट-४-अ स्थावर मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६)च्या तरतुदींनुसार सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१, फोन : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेब : www.pnbhousing.com

बी.ओ.: ४०७ आणि ४०८, ४था मजला, पद्म विश्व लॅण्डमार्क, तनिष्क शोरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वर, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना रकाना क्र. 'ए'मध्ये सूचित केलेली नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन रकाना क्र. 'डी'मध्ये गहाण/ सुरक्षित धनको/ **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र. 'सी'मध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/ भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनकोंनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलानुसार **''जसे आहे तिथे आहे, जे आहे तसे आहे''** आणि **''तेथे जे काही आहे या तत्त्वावर''** विक्री केली जाईल. तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट अंमलबजावणी नियम, २००२च्या नियम ८(६) आणि ९ अंतर्गत रकाना क्र. 'ए'मध्ये दर्शविलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/ गहाण ठेवणारे/ कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/ गहाणदार (मृत झाल्यापासून) यांना नोटीस देण्यात आली आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर** प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या म्हणजे **www.pnbhousing.com**.

| कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी) | ताब्यात घेण्याचे स्वरूप (सी) | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी) | आरक्षित किंमत (आरपी) (ई) | ईएमडी (आरपीच्या १०%) (एफ) | बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी) | बोलीवृद्धी दर (एच) | तपासणीची तारीख आणि वेळ (आय) | लिलावाची तारीख आणि वेळ (जे) | ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरणे जर असतील, तर (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचओयू/एनएसके/१२१६/३३९९९८ संतोष नथू जोपळे/ भारती संतोष जोपळे बी.ओ. : नाशिक | रु. ३०,४२,२२८.७३ आणि १९.०२.२०२० | भौतिकदृष्ट्या ताबा | फ्लॅट क्र. ७, तिसरा मजला, प्लॉट क्र. १०, गौरव पार्क अपार्टमेन्ट, शनी मंदिराजवळ, गजपंथा स्टॉपसमोर, दिंडोरी रोड, म्हसरूळ शिवार, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ००१, भारत. | रु. २,९८१,००० | रु. २९८,१०० | २९.०७.२०२५ | रु. १०,००० | २३.०७.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते ०४.०० वा.दरम्यान | ३०.०७.२०२५ रोजी दु. ०२.०० वा. ते ०३.०० वा.दरम्यान | माहीत नाही |
| एचओयू/एनएसके/१२१७/४६८४९७ सुनील बद्रिनारायण सारस्वत/ पूनम सुनील सारस्वत बी.ओ. : नाशिक | रु. १३,६७,०३६.०५ आणि ३१.०३.२०२१ | भौतिकदृष्ट्या ताबा | फ्लॅट क्र. ०५, २रा मजला, जय कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ३९४ एस, छोटू टेलरच्या वर, पेठे स्कूलच्या मागे, एमजी रोड, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ००१, नाशिक, भारत. | रु. ९६४,००० | रु. ९६,४०० | २९.०७.२०२५ | रु. १०,००० | १६.०७.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते ०४.०० वा.दरम्यान | ३०.०७.२०२५ रोजी दु. ०२.०० वा. ते ०३.०० वा.दरम्यान | माहीत नाही |
| एचओयू/एनएसके/१०१८/५९५६०० सूरज भागवत भांगरे/ लता भागवत भांगरे बी.ओ. : नाशिक | रु. १४,७४,६०८.७१ आणि ३१.०३.२०२१ | भौतिकदृष्ट्या ताबा | एकल इमारत, २रा मजला, १५, लक्ष्मी महल, सीटीएस क्र. ०४, क्र. ९५/४, सेन्ट्रल बँकेच्या पुढे, पठाडे गल्ली, गंगापूर गाव, गंगापूर गावठाण शिवार गंगापूर रोडच्या समोर, नाशिक, महाराष्ट्र-४२२ २२२. | रु. १,०८०,००० | रु. १०८,००० | २९.०७.२०२५ | रु. १०,००० | १७.०७.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते ०४.०० वा.दरम्यान | ३०.०७.२०२५ रोजी दु. ०२.०० वा. ते ०३.०० वा.दरम्यान | माहीत नाही |
| एनएचएल/एनएसके/१११९/७५४१४३ नरेंद्रकुमार मधुकर राणे/ प्रीति नरेंद्रकुमार राणे बी.ओ. : नाशिक | रु. ३१,३४,८७५.३ आणि ११.१७.२०२१ | भौतिकदृष्ट्या ताबा | कार्यालय क्र. ४, ५, ६, २रा मजला, प्रतिभा संकुल, तरण तलावासमोर, बिटको कॉलेजच्या मागे, नाशिक रोड, नाशिक, महाराष्ट्र-४२२ १०१, भारत. | रु. ३,१२४,००० | रु. ३१२,४०० | २९.०७.२०२५ | रु. १०,००० | २८.०७.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते ०४.०० वा.दरम्यान | ३०.०७.२०२५ रोजी दु. ०२.०० वा. ते ०३.०० वा.दरम्यान | माहीत नाही |

***आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/ किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @ १८% दरसाल लागू आहे. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी आणि माहितीनुसार, यावर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मालमत्तेसंदर्भात इतर कोणतेही दायित्व/ दावे नाहीत, जे रकाना क्र. 'के'मध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराकडून त्याच्या/ तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/ अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. (१.)** आजपर्यंत पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्याला वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मालमत्तेची विक्री, विल्हेवाट आणि/ किंवा विल्हेवाट लावण्यापासून प्रतिबंधित करणारा आणि/ किंवा न्यायालयाचा आदेश नाही. **(२.)** संभाव्य खरेदीदार/ बोलीदार आणि इच्छुक पक्ष स्वतंत्रपणे कार्यवाही/ ऑर्डर इ. जर असेल तर, रकाना क्र. 'के'मध्ये नमूद केलेल्या बाजूची तपासणी करू शकतात. पीएनबीएचएफएलकडे उपलब्ध असलेल्या शीर्षकाच्या दस्तऐवजांच्या शीर्षकासह; परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/ बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्याआधी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्या. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(३.)** कृपया लक्षात घ्या की, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(३)नुसार बोली लावणारा/ खरेदीदार कायदेशीररीत्या विक्री किमतीच्या २५% रक्कम जमा करण्यास बांधील आहे (इसारा ठेव अनामतसह, जर असेल तर, जमा) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसानंतर नाही. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(२)नुसार सुरक्षित धनकोकडून विक्री किमतीच्या २५% रक्कम मिळाल्यानंतरच विक्रीची पुष्टी बोलीदाराच्या नावे केली जाऊ शकते. विक्रीच्या मोबदल्याच्या उर्वरित ७५% रक्कम खरेदीदाराने विक्री पुष्टीकरण पत्राच्या पोचपावती तारखेपासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे आणि अशा ठेवी न दिल्यास, मालमत्ता/ सुरक्षित मालमत्ता पुन्हा विकली जाईल. **(४.) सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारे विक्री आयोजित करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याला मदत करेल, जिचे प्लॉट नं. ६८, ३रा मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरियाणा-१२२ ००३ येथे कॉर्पोरेट कार्यालय आहे. वेबसाइट- www.bankeauctions.com. मालमत्तेची तपासणी किंवा बोली कागदपत्र मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी तुम्हाला गणेश अंकुश/ निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. १८०० १२० ८८००, ई-मेल : auction@pnbhousing.com ही पीएनबीएचएफएलची अधिकृत व्यक्ती आहे किंवा www.pnbhousing.com पाहा.**

**ठिकाण : नाशिक, दिनांक : १५.०७.२०२५**
**सही/- अधिकृत अधिकारी, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

### कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
*जीवन करा समृद्ध!*

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७. फोन : ०२० - ६७०८ ५३०५

**स्थावर मालमत्ता विक्री नोटीस (नियम ८(६) सरफेसी कायदा, २००२ अन्वये)**

अधिकृत अधिकारी, दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. यांनी खालील नमूद केलेल्या थकबाकीदाराचे दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये, बँकेने ताब्यात घेतलेली व खालील प्रमाणे नोंद केलेली स्थावर मिळकत टेंडरद्वारे **''जशी आहे तशी''** विक्री करुन विक्री रकमेतून कर्जाची वसूली करणे करीता इच्छुक खरेदीदारांकडून टेंडर्स मागवित आहोत.

| कर्जदार कंपनी, संचालक, गहाणदार, जामिनदारांचे नाव आणि शाखा | १३(२) मागणी नोटीस तपशील: दिनांक | १३(२) मागणी नोटीस तपशील: मागणी नोटीस रक्कम | ताबा दिनांक | विक्री/लिलाव तपशील: दिनांक | विक्री/लिलाव तपशील: वेळ |
|---|---|---|---|---|---|
| **मे. कृष्णा सोलर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड,** **रजि. पत्ता** : रो हाऊस नं. ८, श्रद्धानंद पार्क, आनंदवल्ली शिवार, सातपूर पाईपलाईन रोड, नाशिक-४२२००७. | २१.०६.२०२३ | ₹ २,९७,०७,१२८.६१ + त्यावरील व्याज, आकार इ. | २२.०७.२०२४ | ०१.०८.२०२५ | दु. १२:३० वा. |

**सौ. साके रुक्मिणी विठ्ठल,**
**राहणार** : रो हाऊस नं. ८, श्रद्धानंद पार्क, आनंदवल्ली शिवार, सातपूर पाईपलाईन रोड, नाशिक-४२२००७.

**श्री. लगड सयाजी तात्याभाऊ,**
**राहणार** : १५७६, साबळे मळा, कोलगांव, साकेवाडी, श्रीगोंदा, अहमदनगर-४१३७२८.

**श्री. पगारे शरद जयवंत**
**राहणार** : १७, वनविहार कॉलनी, सातपूर, नाशिक-४२२००७.

**श्री. साके विठ्ठल अप्पासाहेब**
**राहणार** : रो हाऊस नं. ८, श्रद्धानंद पार्क, आनंदवल्ली शिवार, सातपूर पाईपलाईन रोड, नाशिक-४२२००७.

**श्री. साके गणेश विठ्ठल**
**राहणार** : रो हाऊस नं. ८, श्रद्धानंद पार्क, आनंदवल्ली शिवार, सातपूर पाईपलाईन रोड, नाशिक-४२२००७.

**श्री. साके गौरव विठ्ठल**
**राहणार** : रो हाऊस नं. ८, श्रद्धानंद पार्क, आनंदवल्ली शिवार, सातपूर पाईपलाईन रोड, नाशिक-४२२००७.

**श्री. जोशी दिपेश रमेश**
**राहणार** : बी ४०३, ड्रीम कॅसल, मखमलाबाद रोड, स्वामी समर्थ मंदिराजवळ, पंचवटी, नाशिक - ४२२००३.

**मिळकतीचे वर्णन**
**(श्री. विठ्ठल अप्पासाहेब साके यांच्या मालकीची.)**

नाशिक, तालुका आणि जिल्हा नाशिक येथे स्थित, नाशिक महानगरपालिका यांच्या हद्दीतील, नाशिक शहरी समूह यांच्या हद्दीतील जुना आर.एस नं. २७/५/४+२७/६/२ (नवीन स.नं. २७/६/२ आणि २७/३/४/५/११) याचे क्षेत्रफळ ५६०० चौ.मी. असून रो हाऊस नं. डी-८ च्या सर्वसामाईक भागाचे चटई क्षेत्रफळ ८०.४३ चौ.मी. म्हणजेच बांधकाम क्षेत्रफळ १११.७६२ चौ.मी., विशेष हक्कासहीत टेरेसचे क्षेत्रफळ ९.९५ चौ.मी. आणि कव्हर्ड पार्किंगचे क्षेत्रफळ ६.२५ चौ.मी., तसेच श्रद्धानंद पार्क प्रोजेक्टमधील अविभाजित मालकी क्षेत्रफळ ७३.५८ चौ.मी. आहे.

| राखीव किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|
| ₹ ४५.६३ लाख (₹ पंचेचाळीस लाख त्रेसष्ट हजार फक्त) | ₹ ४.६० लाख (₹ चार लाख साठ हजार फक्त) |

**कै. सौ. साके भागूबाई अप्पासो. (मयत असल्यामुळे त्यांच्या कायदेशीर वारसदारांमार्फत)**
**ए) श्री. साके विठ्ठल अप्पासाहेब,**
**राहणार** : रो हाऊस नं. ८, श्रद्धानंद पार्क, आनंदवल्ली शिवार, सातपूर पाईपलाईन रोड, नाशिक-४२२००७.

**शाखा : बनकर चौक, नाशिक**

**विक्री/लिलावाचे ठिकाण** - दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., ''बनकर चौक शाखा, नाशिक : शॉप नं. १ ते ६, उमिया शक्ती को-ऑप. हौसिंग सोसायटी, स.नं. ४७१/१+२, भाग १+२, बनकर चौक, काठे लेन, द्वारकाजवळ, नाशिक (फोन : ०२५३ - २५९०६४८).

**अटीं व शर्ती - १.** वरील प्रमाणे नमूद केलेली स्थावर मिळकत ही **''जी आहे जेथे आहे, जशी आहे तशी व तेथे जे आहे''** या तत्वावर विक्री केली जाईल. **२.** टेंडर दाखल करणेपुर्वी अधिकृत अधिकारी यांच्याशी सदर मिळकतीचे मालकी हक्क, टायटल व देयके इ. संदर्भात शहानिशा करून घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील व नंतर याबाबत कुठल्याही प्रकारच्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही. (टेंडर फॉर्म मिळण्याचे ठिकाण दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., ''बनकर चौक शाखा, नाशिक : शॉप नं. १ ते ६, उमिया शक्ती को-ऑप. हौसिंग सोसायटी, स.नं. ४७१/१+२, भाग १+२, बनकर चौक, काठे लेन, द्वारकाजवळ, नाशिक'' यांच्या नावे (फोन : ०२५३ - २५९०६४८). **३.** इच्छुक खरेदीदार यांनी आपले बयाणा रक्कमेचे पे ऑर्डर/डीडीसह दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. **दि. ३१.०७.२०२५ रोजी सायं. ६.००** वाजेपर्यंत पाठविण्यात यावे. **४.** इच्छुक खरेदीदार यांनी आपले टेंडर/ऑफर्स बयाणा रकमेचे पे ऑर्डर/डीडी सीलबंद पाकीटात घालुन व पाकीटावर स्वतंत्रपणे **''मे. कृष्णा सोलर सर्व्हिसेस प्रा.लि. (श्री. विठ्ठल अप्पासाहेब साके यांच्या मालकीची मालमत्ता) यांची गहाण मिळकत खरेदीसाठी टेंडर''** असे स्पष्ट नमुद करावे. सदर विक्री/लिलाव आपल्यावर कायम न झाल्यास आपण भरलेली बयाणा रक्कम परत करण्यात येईल. तसेच रिझर्व्ह किमतीपेक्षा कमी किमतीला आलेले टेंडर्स/ऑफर्स विचारात घेतले जाणार नाही. सदर बयाणा रकमेवर व्याज दिले जाणार नाही. **५.** विक्री कार्यवाहीतील स्थावर मिळकतींबाबत आवश्यक ते स्टॅम्प ड्युटी/इतर चार्जेस/ट्रान्सफर आणि रजिस्ट्रेशन चार्जेस, फीज, टीडीएस ई. सर्व अनुषंगिक खर्च नियमानुसार व वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार खरेदीदारास करावा लागेल. **६.** सर्व वैधानिक/गैर वैधानिक देय, कर, दर, मूल्यांकन, शुल्क, दावे इ. जबाबदारी फक्त खरेदीदाराची असेल. **७.** सर्व टेंडर्स/ऑफर्स उघडल्या नंतर संभाव्य बोलीदारांना आपापल्या बोली वाढविण्याची संधी देण्यात येईल. बोली हस्तांतर करता येणार नाही. **८.** विक्री कार्यवाहीतील ज्या बोलीदाराची बोली सर्वात जास्त आहे अशा कायम केलेल्या बोलीदाराने २५% रकमेची (त्याच्या बोलीच्या) पुर्तता पुढील १ दिवसाच्या कार्यालयीन वेळेत करणे आवश्यक आहे. सदर रकमेमध्ये त्याने भरलेल्या बयाणा रकमेचा अंतर्भाव करण्यात येईल. सदर रक्कम ''दि कॉसमॉस को-ऑप बँक लि.'' यांच्या नावाने बँकर्स चेक/डी.डी. द्वारे अदा करण्यात यावी. सदर २५% रकमेची पुर्तता बोलीदाराकडून दिलेल्या मुदतीत न झाल्यास त्यांनी भरलेली बयाणा रक्कम कोणतीही पुर्वसुचना अथवा नोटीस न देता जप्त करण्यात येईल. **९.** २५% रकमेचा भरणा केल्यानंतर व अधिकृत अधिकारी यांनी विक्री/लिलाव कायम केल्यानंतर उर्वरीत ७५% रक्कम पुढील १५ दिवसांत कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक राहील. जर सदरचा भरणा सदर मुदतीत केला गेला नाही तर भरलेली २५% रक्कम जप्त करण्यात येईल व सदर स्थावर मिळकतीची विक्री कारवाई पुन्हा करण्यात येईल. **१०.** मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी दिनांक **२८.०७.२०२५** रोजी **स. ११ :०० ते सायं. ०५:००** वाजता या वेळेत करता येईल **११.** बँकेच्या माहीतीप्रमाणे वरील नमूद मिळकतीवर कोणत्याही प्रकारची देणी नाहीत. **१२.** सदर लिलावाच्या टेंडर्स/ऑफर्स स्विकारणे न स्विकारणे, लिलाव कायम करणे, पुढे ढकलणे, रद्द करणे व इतर सर्व हक्क कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी यांचे राहील. **१३.** विक्री/लिलावाच्या तपशिलवार अटीं व शर्ती लिलावाच्या वेळी व लिलावाच्या ठिकाणी वाचण्यात येतील. **१४.** सदर विक्री नोटीस ही बँकेच्या अधिकृत वेबसाईट म्हणजेच **www.cosmosbank.com** वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**टिप:-** सदरची १५ दिवसांची नोटीस नियम ८(६) एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ अन्वये कर्जदार/संचालक/गहाणदार/जामिनदार यांना सुध्दा लागू आहे.

**दिनांक** : १५.०७.२०२५
**ठिकाण** : नाशिक

**राजेश रामदास शहा**
अधिकृत अधिकारी आणि सहाय्यक महाव्यवस्थापक,
**कॉसमॉस को-ऑप. बँक लि.**